कुणी शोक मोहा निरसी वदे रे । कुणी वारि त्या कामक्रोधास बा रे ॥
कुणी तारि पाशांतुनी ? श्रीगुरू रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४० ॥
कुणी रे कुणी वारि तापत्रया रे । कुणी त्रैगुणांतें क्षणीं आंवरी रे ॥
कुणी चित्तबुद्धी मना सांवरी रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४१ ॥
कुणी या मनातें धरी बांधुनी रे । सदा स्वैर संचार कैसा करी रे ॥
न राहे मुळीं ठेवितां बांधुनी रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४२ ॥
अगा ! श्रीवरा ! काय आतां करूं रे । कसें या मना आवरूं तें वदे रे ॥
कधीं एक ठायीं न राही कसें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ ४३ ॥
कधीं ईश्वरा राहिं हें स्वस्थ बा रे । चळे नित्य हें व्यर्थ घाली पसारे ॥
ठरे ना मुळीं हें क्षण एकही रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४४ ॥
बहू आर्जवीतां न मानीच तें रे । कळेना कसें खेळ आहे वृथा रे ॥
करी नित्य जंजाळ, तें नावरे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४५ ॥
किती रंजवूं खेळवूं, प्रार्थुं या रे । जसें वत्स हें हट्ट सोडीच ना रे ॥
तया बोधितां नायकें तें मुळीं रे ! श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४६ ॥
न जावें जिथें धांव घेई त्वरें रे । करावें न जें, तें करी नित्यशा रे ॥
स्वधर्माचिया सोडुनी सत्पथा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४७ ॥
जई मानसीं प्राणि हो व्यग्र बा रे । जई चित्त हें व्याप्त होई, तई रे ॥
गुरू, सद्गुरुस्वामि होती उभे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४८ ॥
जई जीव व्याकूळ होई असा रे । जई अंतरीं दृढ आस्था वसे रे ॥
जई ध्येय तें अंतरीं बिंबतें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १४९ ॥
तई रे तई सद्गुरु ते उभे रे । जिवा मार्ग दावावयातें मुदें रे ॥
परार्थीच दृष्टी गुरू लाविती रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५० ॥

## सद्गुरुवंदन

नमो सद्गुरुस्वामिराया ! सख्या ! रे । नमो मार्गदीपा ! तुला आदरें रे ॥
तुझ्या सत्कृपें हेंचि सेवा घडो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५१ ॥
नमूं साइनाथा ! समर्था तुला रे । नमूं ज्ञानमूर्ते पदाब्जीं सदा रे ॥
नमूं दीनबंधो ! पदीं ठाव दे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५२ ॥
अम्ही बाळ अज्ञान आहोंत बा रे । करीं घेउनी दावि तूं सत्पथा रे ॥
जयें सत्य कल्याण हो आमुचें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५३ ॥
असो दृढ विश्वास हा त्वत्पदीं रे । गुरूराज स्वामी जिवा उद्धरी रे ॥
गुरूवीण आधार नाहीं जिवा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५४ ॥
जसे थोर ते बोधिती, चालती रे । तयांच्या पथें चालणें इष्ट हो रे ॥
उगी अन्यमार्गी श्रम होति बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५५ ॥
अगा ! श्रीसमर्था ! भवमोचना रे । किती जीव अज्ञान आम्हीं पहा रे ॥

कळे ना कुठें हीत, अहीत हो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५६ ॥
बहू बोलतां होइ वाचाळ मी रे । न बोलें, जईं मुग्धता दोष ये रे ॥
द्विधा जीव हा होइं देवा पहा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५७ ॥
असें मी असा, दोष माझे बहू रे । समर्था तुझ्या आश्रयीं राहिलों रे ॥
कुणी वत्स ते दूर लोटील बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५८ ॥
गुरूराजया ! तात तूं, मायही रे । सखा, बंधु, त्राता, दिसे ना दुजा रे ॥
तुला बाहतों मी, गुरो तारिजे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १५९ ॥
जरी बोलसी थोर आकांत कां रे । वृथा कां असें वेड हें लागलें रे ॥
गुरूराजया ! स्वास्थ्य नाहीं जिवा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६० ॥
कुणी दीन जीवांसि तारी दुजा रे । समर्थांचिही आस म्यां बांधिली रे ॥
उपेक्षा करीनात ते सर्वथा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६१ ॥

## साईवंदन

नमूं भक्तकैवारि साईस बा रे । नमूं श्रीगुरूराजयातें नमूं रे ॥
नमूं श्रीसमर्था ! दयासागरा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६२ ॥
नमूं योगिराया ! भवभंजना ! रे । नमूं दिव्यज्योती ! दयावंत हो रे ॥
पदीं भक्तिची लालसा दे सदा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६३ ॥
गमो भक्तिचा मार्ग सोपा असा रे । परी जोड दे यासि ज्ञानाचिही रे ॥
जयें दिव्य संस्कार होती जिवा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६४ ॥
नमूं दिव्य तेजा ! भवपारदा ! रे । नमूं सत्यमूर्ते तमनाशना ! रे ॥
नमूं दीनबंधो ! शिरी राहिजे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६५ ॥
भवाच्या भयें जीव व्याकूळ हो रे । तुला पाहतां, आस जीवीं भरें रे ॥
तुला बाहतां, श्रीगुरो ! धांव घे रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६६ ॥
कृपावंत तूं साइनाथा ! सदा रे । कृपेनेंच त्वां तारिले भक्त बा रे ॥
कृपा ते तुझी याचितों आम्हि बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६७ ॥
तुझीया कृपें पार जाऊं भवीं रे । तुझ्या सत्य बोधामृतां सेवुं बा रे ॥
जसा मार्ग त्वां दाविला आक्रमूं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६८ ॥
समर्थांचिया बालका दैन्य ना रे । समर्थांचिया बालका सौख्य हो रे ॥
समर्थांचिया सत्कृपें ज्ञान हो रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १६९ ॥
कृपावंत ते संत राहो शिरीं रे । सदा दिव्य सन्मार्ग दावोत ते रे ॥
नभीं ते ऋषी सात अखंड बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७० ॥
गुरूच्या कृपें देहिं ये दिव्यता रे । गुरूच्या कृपें संतसेवा घडे रे ॥
गुरु सद्‌गुरु–त्र्यंबकांतें नमूं रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७१ ॥
नमूं सर्व संतांसि आतां तसें रे । कृपाछत्र देतील तें भाविकां रे ॥
तसें सत्य कल्याण हो तत्कृपें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७२ ॥

नमूं श्रोतृवृंदासि तेवीं मुदें रे । जयें ऐकिली हें कथा दक्षते रे ॥
तुम्ही संतमूर्तीच आहांत बा रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७३ ॥
नमूं तेवि श्रीसत्यविनायका रे । जयें कार्य निर्विघ्न केलें असे रे ॥
नमूं शारदादेवितें आदरें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७४ ॥

## देहविसर्जनतिथि

जयें अश्विनी शुक्लपक्षांत या रे । तिथी साधिली पुण्य एकादशी रे ॥
तयें साधिलें सार्थका सत्य बा रे । श्रीनाथ नारायणा माधवा रे ॥ १७५ ॥
अजीं झालि पस्तीस संवत्सरें रे । प्रभू साइतें जाउनी स्वगृहीं रे ॥
उरे दिव्य कीर्तीच पश्चात ते रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७६ ॥
जना दाविला मार्गही चोख बा रे । धरा नाम कंठीं, स्मरा श्रीहरी रे ॥
सुखें शांति ती अक्षयी ये तुम्हां रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७७ ॥

× × × ×

शिरीं वंदितों साइनाथा तुम्हां रे । पदाब्जां सदा सांठवी मी हृदीं रे ॥
पहा दीन वत्सास या सत्कृपें रे । श्रीनाथ नारायण माधवा रे ॥ १७८ ॥

॥ श्रीसाईनाथार्पणमस्तु । शुभं भवतु ॥

—श्रीपाद

वेस्टर्न कार्ड्स




★ वेस्टर्न क्लब
★ एव्हर लास्ट
★ वेल्डन ★ लण्डन नेल्ही
★ वेस्टर्न बेबी

वेस्टर्न प्लेईंग कार्ड कं.
मुंबई नं ४

जाड कागद व बारा रंगांत
(आकार १४"×२०")
महात्मा गांधी, पं. नेहरू, नेताजी सुभाष, राणा प्रताप, श्री शिवाजी महाराज इ. तसेंच देवादिकांचीं रंगीत सुंदर चित्रें

मॉडर्न लिथो प्रेस
मुंबई ४

# नामजप

: लेखक :
ना. वा. गुणाजी
ठळकवाडी, बेळगांव

**तज्जपस्तदर्थभावनम्**

—योगसूत्र, १–२८

जेव्हां व्यक्ति, समाज, राष्ट्र अथवा विश्व परमेश्वरविन्मुख होऊन जडवाद किंवा भौतिकवाद यावर विश्वास ठेवूं लागतें, तेव्हां दुःख आणि दैन्य यांची परंपराच सुरू होते. आज आमचा भारत देश स्वतंत्र झाला आहे खरा, पण तो सुखी झाला आहे असें कोण म्हणूं शकेल? इतर स्वतंत्र देशांची गोष्ट घ्या. ते तरी कुठें सुखी आहेत! एक देश दुसऱ्या देशावर आक्रमण करण्याची योजना आंखीत आहे. स्वतंत्र आणि संपन्न देश अणुबॉंबसारखीं विध्वंसक आणि संहारक अशीं शस्त्रास्त्रें शोधून काढीत आहेत आणि तृतीय युद्धाची तयारी करीत आहेत. त्यामुळें सर्व लोक फिकीरींत आणि काळजींत आहेत. शिवाय अवर्षण, अतिवर्षण, दुष्काळ, अनेक महारोगांच्या सांथी, ज्वालामुखी, पर्वतांचे उद्रेक, चोर दरोडेखोर डाकू यांचा उपद्रव, खून मारामाऱ्या इत्यादिकांपासून लोकांना फार त्रास होत आहे, आणि ते यामुळें हवालदिल झाले आहेत. यावर उपाय काय?

या कलियुगामध्यें भगवंताच्या नामाचा जप करणें हेंच एकमेव साधन किंवा गति आहे, दुसरा उपाय नाहीं असें नारदपुराणांत सांगितलेलें आहे. त्यावर श्रद्धा ठेवून गोरखपूरच्या कल्याण ( हिंदी ) आणि कल्याणकल्पतरु ( इंग्रजी ) या दोन्ही मासिकांचे संपादक आज कित्येक वर्षें, मासिकांच्या वाचकांनीं आणि त्यांच्या इष्टमित्रांनीं कार्तिक शु॥ १५ ते चैत्र शु॥ १५ पर्यंत दररोज न चुकतां कमींत कमी १०८ वेळां मंत्राचा–भगवन्नामाचा जप करावा असा प्रचार करीत आहेत, आणि या मुदतींत एकंदर जपसंख्या किती झाली हें प्रसिद्ध करीत आहेत. इतर सालें सोडून देऊन आम्ही येथें नमुन्यासाठीं एक सालाचीच आंकडेवारी देत आहों. कल्याण (आक्टोबर १९५३) वर्ष २७, अंक १०, पान १३७१ येथें असें लिहलें आहे कीं, ५६७ स्थानांतून जपसंख्येची सूचना मिळाली. कांहीं ठिकाणांहून ती आली नसेल. मंत्रजपाची संख्या १८,८४, ९९,४०० इतकी आहे आणि नामसंख्या ३,०१,५९,९०,४०० इतकी आहे, भारताच्या बाहेरहि नामजप झाला आहे, पण त्याची संख्या यांत नमूद नाहीं. यांचा मंत्र असा आहे —

**हरे राम हरे राम, राम राम हरे हरे**
**हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥**

या मंत्राशिवाय इतर भगवन्नामाचा जपहि झाला असेल. त्यांचाहि वरील जप-संख्येंत समावेश नाहीं. शिवाय कांहीं लोकांनीं अधिक जप, उठतां बसतां, चालतां

फिरतां आणि इतर कामें करतां, बिनसंख्या ( न मोजतां ) केला असेल, त्यांची ही यांत गणना नाहीं.

अनेक वर्षें चाललेल्या या प्रचारापासून जपसंख्येचा आंकडा बराच मोठा फुगला असेल यांत शंका नाहीं. पण संपादकांच्या अपेक्षेप्रमाणें, वैयक्तिक, सामाजिक किंवा राष्ट्रीय दुःखांचें निरसन झालें आहे असें दिसून येत नाहीं; उलट दुःख–दैन्य–परंपरा उत्तरोत्तर वाढतच आहे.

## अखंड महामंत्र

हिमालयावरील तपोवनांत राहणारे श्री स्वामी तपोवनजीमहाराज यांचे शिष्य श्री स्वामी चिन्मयानंदजी हे एक मोठे ज्ञानी उपनिषद्–पंडित आहेत. त्यांनीं अलिकडे दोन वर्षांपासून उपनिषद्–ज्ञान–यज्ञाची मोहीम सुरू केली आहे. त्यांनीं १९५२ मध्यें पुण्यांत १०१ दिवस राहून केन आणि कठ या उपनिषदांवर, मद्रासमध्यें ४१ दिवसांत मुंडकोपनिषदावर, नवी दिल्लीमध्यें ९१ दिवसांत मांडुक्य उपनिषद् आणि गौडपादकारिका यांवर, १९५४ च्या आरंभीं केरळ–पालघाटमध्यें २१ दिवसांत ईशोपनिषदावर सार्वजनिक व्याख्यानें दिलीं. आतां फेब्रुवारी ४ ते मार्च २६ पर्यंत मदुरा येथें प्रश्नोपनिषदावर त्यांचें विवेचन चालू होतें. त्यांच्या ज्ञान–यज्ञाची मांडणी, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, अशी असते—

( १ ) रोज सायंकाळीं ७ ते ९ पर्यंत उपनिषदावर प्रवचन चालू असतें. त्या समयीं श्रोत्यांच्या शंकांचें निरसन करून स्वामीजी ध्यानमार्गाविषयीं उपयुक्त सूचना देत असतात.

( २ ) एक आठवडा सकाळीं ८ ते १० पर्यंत तीन किंवा पांच ब्राह्मण उपनिषदांतील मंत्रांनीं आहुति देतात.

( ३ ) अखंड कीर्तन व जपः–२१ दिवस अहोरात्र आळीपाळीनें लोक 'हरे राम हरे राम' या मंत्राचा मंडपांत कीर्तन ( गजर ) व जप करीत असतात. या २१ दिवसभर तेथें **अखंड ज्योति**हि ठेवलेली असते. या दिवसांतहि उपनिषदांवर प्रवच चालू असतें आणि हा जप संपला म्हणजे गांवांतून एक मोठी पादचारी आणि अनेक वाहनें यांची मिरवणूक ( गंगाकलशसह ) काढली जाते. या यज्ञाचे आणि स्वामीजींच्या व्याख्यानाचे रिपोर्ट प्रत्येक आठवड्यांत प्रसिद्ध केले जातात. आणि बहुशः ते गांवांतील आणि बाहेरच्या लोकांना मोफत वांटले जातात.

या मंत्रजपांची हकीकत वाचून मद्रासचे साईसुधेचे संपादक खुष झालेले दिसतात. मार्च १९५३ च्या ( म्हणजे गेल्या रामनवमीच्या ) अंकांत त्यांनीं या जपयज्ञाची प्रशंसा केलेली आहे आणि एक दुरुस्तीहि सुचविली आहे. ती अशीः—

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे राम हरे राम **साई** राम हरे हरे ॥
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण **साई** कृष्ण हरे हरे ॥

## कोटि मंत्रजप

**श्रीसज्जनगडवृत्त**—कोटिमंत्रजप. अनेक ठिकाणीं अनेक मंडळी ( श्रीराम ) जप लिहित आहेत असें कळतें; पण आमच्या हातीं आतांपर्यंत केवळ १५ लक्ष आलेली आहे. अद्यापि ८५ लक्ष मंत्रजप यावयाचा आहे. ( केसरी २९-१-५४ )

या दुसऱ्या प्रकारांच्या जपप्रचारापासून फारशी फलनिष्पत्ति झाली आहे, लोकांचें दैन्य, दारिद्र्य आणि अज्ञान हीं नाहींशीं, अगर मोठ्या प्रमाणांत तरी कमी झालीं आहेत असें दिसून येत नाहीं. याचें कारण काय याविषयीं थोडासा विचार करूं.

## जप, मंत्र यांची व्याख्या

प्रथम आपण जप आणि मंत्र यांचा बरोबर अर्थ काय आहे तें पाहूं. पातंजल-योगसूत्रांत प्रथम पादांत 'ईश्वर' याची व्याख्या दिली आहे आणि प्रणव ( ॐ ) हें त्याचें नांव आहे असें ( १·२७ ) सांगून त्याच्या प्राप्तीसाठीं त्याचा जप करण्यास सांगितलें आहे. 'तज्जपस्तदर्थभावनम्' ( १·२८ ) अशी जपाची व्याख्या सांगितली आहे. त्याचा अर्थ असा कीं, ज्याचा जप करावयाचा त्याच्या अर्थाची स्पष्ट भावना किंवा कल्पना आपल्या मनासमोर पाहिजे. उदाहरणार्थ श्री 'रामा'चा जप करावयाचा तर देवांना राक्षसाच्या बंदीखान्यांतून सोडवून प्रजापालन व प्रजारंजन उत्तम प्रकारें करून लोकांना आनंद देणारा अशी भावना आपल्यासमोर असून आपणहि दुसऱ्यांना आनंद देऊं, जनतेचें सुख आणि समाधान वाढवूं, असें आचरण करूं असा निश्चय केला पाहिजे आणि त्याप्रमाणें आचरण केलें पाहिजे. तसेंच श्री 'गोपाल-कृष्ण' नामाचा जप करावयाचा तर, श्रीकृष्णानें जसें गोपालन केलें तसें, म्हणजे ती भावना बाळगून आपणहि गाईचें संरक्षण केलें पाहिजे, नुसतें तोंडानें राम राम किंवा कृष्ण कृष्ण म्हणून गजर केल्यानें कांहीं विशेष फायदा होणार नाहीं. श्रीराम किंवा श्रीकृष्ण हे मंत्र समजून त्या मंत्रांचा जप करावयाचा तर त्यांचें भावना-पूर्वक मनन केलें पाहिजे. 'मननात् मंत्रः' या मंत्राच्या व्याख्येवरूनहि हेंच सिद्ध होतें. भावनापूर्वक किंवा मननपूर्वक जप न करितां नुसता शब्दोच्चार किंवा गजर करणें याला खरा जप म्हणतां येणार नाहीं, तो शब्दांचा गोंगाट किंवा गोंधळ होईल.

मंत्राचीं जितकीं अक्षरें असतील तितके लक्ष जप करावा असें म्हणतात. उदाहरणार्थ, राम हा दोन अक्षरीं मंत्र, त्याचा दोन लक्ष जप केल्यास पुरे; अधिक केल्यास 'अधिकस्याधिकं फलम्' असें म्हणतात. मंत्राचीं जितकीं अक्षरें तितके कोटी जप करावा असेंहि कांहीं म्हणतात. श्रीसमर्थ रामदास स्वामींनीं रामनामाच्या त्रयोदशाक्षरी मंत्राचा तेरा कोटी जप केला होता, हें प्रसिद्ध आहे. यांत महत्त्वाचा प्रश्न असा आहे कीं, संख्यायुक्त जप करावयाचा म्हणजे जितकी संख्या मोठी असेल त्या मानानें व्यस्त ( कमी ) प्रमाणांत जपाच्या अर्थाकडे लक्ष्य लागेल. सारें लक्ष्य जपसंख्या पुरी करण्याकडे लागेल हें सांगणें न लगे. जपाचे तीन प्रकार आहेत : (१) वाचिक, ( २ ) उपांशु आणि ( ३ ) मानस. मोठ्यानें म्हणजे लोकांना ऐकूं जाईल अशा स्वरानें जो

जप केला जातो तो वाचिक जप; आपला शब्द आपणासच ऐकूं येईल इतका हळू जो जप केला जातो तो उपांशु जप; आणि ओठ किंवा जीभ न हालवितां फक्त मनानेंच –मनांत जो जप केला जातो तो मानस जप. वाचिक जपापेक्षां उपांशु जप श्रेष्ठ, उपांशु जपापेक्षां मानस जप श्रेष्ठ आहे. उपांशु आणि मानस जपांमध्यें मंत्राच्या अर्थाकडे अनुसंधा लावण्यास अधिक संधि मिळते. हें सर्व लक्ष्यांत ठेवून कल्याण संपादकांच्या संख्यायुक्त-जपांत किंवा श्रीचिन्मयानंदस्वामींच्या अखंड नामगजरांत मंत्राच्या अर्थाकडे कितपत लक्ष्य लागणें शक्य आहे आणि चंचल मनाच्या वासनाजालांत तें कितपत लागत असेल याचा नीट विचार करावा. प्रथम या षोडशाक्षरी मंत्रांत तीन देवतांचीं नांवें आलेलीं आहेतः राम, कृष्ण आणि हरि. राम आणि कृष्ण यांची कल्पना आम्हांस आहे, हरीची कल्पना कांहीं विशेष नाहीं. साईसुधा संपादक त्यांत आणखी एक (श्रीबाबांचें) नांव घालण्यांत यावें अशी शिफारस करितात. तेव्हां हा षोडशाक्षरी मंत्र जपतांना कोणत्या देवतांची स्पष्ट भावना मनासमोर ठेविली जाते हें तो मंत्र जपणारांनींच सांगावें. कोणी असें म्हणतील कीं, हीं एका परमेश्वराचींच नांवें आहेत. हें खरें आहे. त्याला उत्तर असें कीं, एका परमेश्वराचींच हीं नामें आहेत तर एकच नाम आणि तेंहि योगसूत्रांत सांगितल्याप्रमाणें '**प्रणव**' (ॐ) जप आणि तोहि उत्तम प्रकारें करण्यास पुरें आहे.

'हरे राम हरे राम०' या षोडशाक्षरी मंत्राविषयीं आणखी थोडा विचार केला पाहिजे. कल्याण मासिकाचे संपादक किंवा श्री चिन्मयानंदस्वामी समजतात तसें हा मंत्र सर्व दुःख, दैन्य, आधिव्याधि, संकटपरंपरा यांवर रामबाण तोडगा नाहीं. साईसुधा संपादक सांगतात कीं, हा सर्वसार उपनिषद् मंत्र आहे. श्रीचिन्मयानंदजी म्हणतात कीं (केनोपनिषद यज्ञ प्रसाद पान १२५) हा मंत्र नेहमीं गाऊंया. तो आम्हांस उपनिषदांत सांगितलेलें कैवल्य देईल. तेव्हां असा हा सर्वश्रेष्ठ उपयुक्त मंत्र कुठें आहे याचा शोध करितां तो 'कलिसंतरणोपनिषत्'मध्यें सांपडला. मुख्य अधिकृत प्रमाणभूत अशीं जीं मुख्य १२–१३ उपनिषदें आहेत त्यांत हें उपनिषद् नाहीं. हें एक निराळेंच छोटेंसें उपनिषद् असून त्याचा कर्ता कोण याचा पत्ता नाहीं. हें बरेंच आधुनिक दिसतें. कोणीतरी राम–भक्तिमार्गीयानें हें लिहून उपनिषदांत घुसडून दिलें असावें. वरील षोडशाक्षरी मंत्राचा बराच गाजावाजा झाला आहे व होत आहे. तेव्हां या मंत्रा-विषयीं सदर उपनिषदांत काय सांगितलें आहे हें नीट पाहिलें पाहिजे. हें छोटें असल्या-मुळें येथें सार्थ देण्यांत येत आहे.

## कलिसंतरणोपनिषत्

यद्दिव्यनाम स्मरतां संसारो गोष्पदायते ।
स्वानन्यभक्तिर्भवति तद्रामपदमाश्रये ॥ १ ॥

ॐ सह नाववत्विति शांतिः ।

हरिःॐ । द्वापारान्ते नारदो ब्रह्माणं जगाम कथं भगवन् गां पर्यटन्कालिं संतरेयमिति । स होवाच ब्रम्हा साधु पृष्टो ऽस्मि । सर्वश्रुतिरहस्यं गोप्यं तच्छृणु येन कलिसंसारं तरिष्यासि । भगवत आदिपुरुषस्य नारायणस्य नामोच्चारमात्रेण निर्धूतकलिर्भवति। नारदः पुनः पप्रच्छ तन्नाम किमिति । स होवाच हिरण्यगर्भः । हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ १ ॥ इति षोडशकं नाम्नां कलिकल्मषनाशनम् ! नातः परतरोपायः सर्व वेदेषु दृश्यते ॥ २ ॥ इति षोडशकलस्य जीवस्यावरणविनाशनम् । ततः प्रकाशते परं ब्रह्म मेघापाये रविरश्मिमंडलीवेति । पुनर्नारदः पप्रच्छ भगवन्कोऽस्य विधिरिति । तं होवाच नास्य विधिरिति । सर्वदा शुचिरशुचिर्वा पठन्ब्राह्मणः सलोकतां समीपतां सरूपतां सायुज्यतामेति । यदास्य षोडशीकस्य सार्धत्रिकोटीर्जपति तदा ब्रह्महत्यां तरति वीरहत्याम् । स्वर्णस्तेयात्पूतो भवति । पितृदेवमनुष्याणामपकारात्पूतो भवति । सर्वधर्मपरित्यागपापात्सद्यः शुचितामाप्नुयात् । सद्यो मुच्यते सद्यो इत्युपनिषत्॥ ॐ सह नाववत्वितिशांतिः । हरि ॐतत्सत् । इति कलिसंतरणोपनिषत्समाप्ता ॥

## अर्थ

### कलिसंतरणोपनिषत्

जें दिव्यनाम स्मरण करणाऱ्यांचा संसार गाईच्या पावलाप्रमाणें होतो आणि त्यांची आपल्या (आत्म्याच्या) ठायीं अनन्यभक्ति होते, त्या **राम** पदाचा मी आश्रय करितों.

ॐसह नाववत्विति शान्तिपाठ ।

हरि ॐ । द्वापार युगाच्या शेवटीं नारद ब्रह्मदेवाकडे गेला आणि, हे भगवन्, पृथ्वीवर फिरत असतां, कलीचें संतरण मी कसें करीन असें विचारूं लागला. तो ब्रह्मदेव म्हणाला—मला चांगला प्रश्न केलास, सर्व श्रुतींचें अति गुप्त असें रहस्य, ज्याचे योगानें तूं कलिसंसार तरून जाशील तें ऐक. भगवान् आदिपुरुष नारायणाच्या नामोच्चारमात्रानें मनुष्य निर्धूतकलि म्हणजे पापरहितपवित्र असा होतो. नारदानें पुनः प्रश्न केला कीं—तें नाम कोणतें ? तो हिरण्यगर्भ ( ब्रह्मदेव ) म्हणालाः—

हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

या प्रमाणें हीं सोळा नांवें कलिकल्मषनाशक आहेत. याशिवाय दुसरा कोणताहि उपाय सर्व वेदांमध्यें दिसून येत नाहीं. याप्रमाणें हीं नांवें षोडशकलायुक्त जीवाच्या आवरणाचें नाश करणारीं आहेत. त्यानंतर ज्याप्रमाणें मेघ दूर झाले असतां, सूर्यकिरणांचें मंडल प्रकाशतें, त्याप्रमाणें परब्रह्म प्रकाशतें. पुनः नारदानें प्रश्न केला कीं, हे भगवन्,

याचा विधि कोणता? त्यानें उत्तर दिलें कीं, याचा विधि नाहीं. सर्वदा शुचि असो अथवा अशुचि असो, हीं नांवें पठण करणारा ब्राह्मण, सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता यांना प्राप्त होतो. (या चारी मुक्ति मिळवितो.) या सोळा नांवांचा जेव्हां साडेतीन कोटी जप होतो तेव्हां ब्रह्महत्या, वीरहत्या यांना मनुष्य तरून जातो. सुवर्णचोरीपासून मुक्त होतो. सर्व धर्मपरित्यागाच्या पापापासून ताबडतोब पवित्रता प्राप्त करून घेतो; तात्काळ मुक्त होतो, तात्काळ मुक्त होतो, इत्युपनिषत् ॥

ॐ सहनाववत्विति शांतिः। हरि ॐ तत्सत्। इति कलिसंतरणोपनिषत् समाप्त.

## थोडीशी चर्चा

या उपनिषदाचा कर्ता हल्लींच्या नामयोगप्रचारकांचा पूर्वज दिसतो. यांनीं वर्णिलेला कथा–प्रसंग काल्पनिक दिसतो. आदिपुरुष नारायणाच्या नामोच्चारमात्रानें मनुष्य पापरहित–पवित्र होतो हें ब्रह्मदेवाच्या तोंडचें उत्तर ठीक आहे. कोणतेंहि एक त्या आदि-पुरुषाचें नांव नामोच्चारासाठीं किंवा जपासाठीं पुरें झालें असतें. त्यान सोळा नांवांची कां शिफारस केली, हें समजत नाहीं. हीं नांवें पठण करणाराला चारी मुक्ति मिळतात आणि या सोळा नांवांचा जेव्हां साडेतीन कोटि जप होतो, तेव्हां ब्रह्महत्या, वीरहत्या, सुवर्णचोरी इत्यादि पापांपासून मनुष्य मुक्त होतो इ. सर्व अर्थवाद दिसतो. मननपूर्वक जप करण्या-पेक्षां, उच्चार किंवा पठण यावरच याचा भर दिसतो. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे या महामंत्राची वाजवीपेक्षां अधिक प्रशंसा केली जाते असें दिसून येतें.


तात्पर्य–परमेश्वराच्या कोणत्याहि एका नामाचें स्मरण करावें, त्याचा जप मननपूर्वक करावा म्हणजे आपलें काम फत्ते होईल यांत संशय नाहीं. याविषयीं श्रीसाईसच्चरित्र-कार सांगतात कीं:—

सांडुनिया लाख चतुराई। स्मरा निरंतर साई साई ॥
बेडा पार होईल पाहीं। संदेह कांहीं न धरावा–१०–१३५
स्मरता साई स्वानंदघन। जपतां तन्नाम अनुदिन ॥
नलगे इतर जपतपसाधन। धारणा ध्यान खटपट ॥ ३५–२२१

ॐ नमो भगवते श्रीसाईरमणाय ॥



द्वारकामाईच्या भिंतीजवळ उभे असलेले श्री साईबाबा




द्वारकामाईत बसलेले श्री साईबाबा

# शेवटचा दीन गोड व्हावा

डॉ. के. भ. गव्हाणकर

चैतन्याची ज्योत, आनंदाची प्रभा, शिरडी वृंदावनांत भरून राहिली आहे. शीलधी –शिरडी हें आनंदस्थान आहे. त्याच्या स्मरणाबरोबर अंगावर रोमांच उभे राहतात. प्रभुलीलेंत तन्मय झालेले भक्त येथें पहावयास मिळतात. शिरडींतील जंगल आतां मंगल झालें आहे. (लेंडीबाग) शिरडी प्रत्यक्ष भू–वैकुंठच-पंढरी आहे. अमृतशक्ति जगास अमरत्वाकडे घेऊन जात आहे. दिव्यशक्ति सर्व भक्तहृदयास आपल्या तेजोमय शक्तींनें प्रकाशीत आहे. बा मानव हृदया! श्री बाबा गेले! नजरे आड झाले तरी 'साईवेणूचा' नाद सारखा ऐकूं येत आहे. स्वयंप्रकाश स्वयंप्रेमांत फांकला आहे. चल! त्या शिरडींत जाऊन श्री बाबांच्या गोड आठवणींनीं प्रेमहृदयाचीं कोमलफुलें त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं त्यांच्या चरणीं वाहूं या!

बा जीवा! नरदेह अत्यंत दुर्लभ आहे. ८४ लक्ष योनींत भटकून, शेवटीं हा नरदेह प्राप्त होतो. ह्या एकाच देहानें, आणि तेंसुद्धां ह्याच जन्मीं भगवंताचा दिव्य प्रसाद–प्रेम साक्षात्कार अनुभवतां येतो. म्हणून त्याला सर्व योनींत आद्य गणलें आहे.

भरताच्या प्रिय भारता! तुझ्यावर प्रभू साईचा मंगलप्रसाद आहे; म्हणूनच श्री साईबाबा रमावराला पहाण्याची, शिरडींत जाण्याची इच्छा होत आहे. सृष्टि निर्माण होण्यापूर्वीं अद्वितीय परमानंदरूप आणि परिपूर्ण असा एक परमात्मा होता. तोच आपल्या मायाशक्तीनें जगदाकार झाला, आणि जगांत जीवरूपानें प्रवेश करून विष्णु आदि अमर देहांत पूज्य झाला; आणि मनुष्यादि मर्त्यलोकांत पूजक झाला.

मनुष्य मरणाला घाबरतो. पण खुळया जीवा, जन्म आणि मरण या अवस्था आहेत. देह ही एक क्रिया आहे. जगांतील एकंदर वस्तु, बा जीवा, तुझ्यासाठीं अनंत अवस्था आहेत. प्रभूचें हें जगविलास अनंतत्व जीवासाठींच आहे. हा शामसुंदर सर्व-शक्तिमान खेळी सर्व अवस्थेनें परिपूर्ण नटला आहे; फरक एवढाच कीं वस्तू मर्यादित आहेत, त्यांना हद्द आहे; आणि प्रभु अमर्याद, सर्वातीत म्हणून निर्गुण निराकार आहे. आत्मा नित्य अपरोक्ष आहे. उदा. आपला नाहींपणा कोणास आवडत नाहीं. प्रत्येक मनुष्य "मी सदा सर्वकाळ आहेंच आहें" असें म्हणतो. हा अनुभव सर्वांनाच आहे, हेंच आत्म्याचें अपरोक्षत्व.

सुख–दुःख, जरा–व्याधी, जन्म–मरण, ह्या केवळ त्या आत्म्यावर नाचणाऱ्या कर्मफलाच्या अवस्था आहेत. मूळांत आयुष्य ही वस्तूच नाहीं. जन्मापासून सुखदुःख भोग भोगण्याकरितां लागणारी कालमर्यादा–ती कालमर्यादा आयुष्य होय. पूर्वजन्मार्जित कर्मफल परिपक्व झालें म्हणजे तें उपभोगण्यासाठीं देहसाधनाच्या योगें व्यक्त

दर्शनें प्रगट होणे म्हणजेच जन्म. कर्मभोग पुरा संपला म्हणजे आयुष्य संपतें; ह्या सर्व अवस्था मर्यादित आहेत. आत्मा सदैव सर्वकाळ आनंदी आहे. उदक जसें मत्स्याचें जीवन आहे तसेंच आनंद हेंच मनुष्यजीवनाचें जीवन आहे.

विश्वंभराच्या ह्या विश्वविलासांत जोगी, योगी, भोगी, विद्वान, अविद्वान, वगैरे सर्व भिन्न भिन्न प्रकारचे लोक जरी असले तरी त्यांमधून आनंदाचा एकसूत्रीपणा सारखा सतत कायम आहे. मनुष्याचें अंतःकरण जन्मतःच आनंदभरित आहे. विषयाच्या योगें तोच प्रतीत होतो. विषयचैतन्य व आत्मचैतन्य ह्यांच्या मिलाफानें अंतःकरणांत असलेल्या आनंदाचा साक्षात्कार अनुभवास येतो. आनंद कोठून बाहेरून येत नाहीं; चंद्रदर्शनानें समुद्राला भरती येते. म्हणजे चंद्र बाहेरून त्या समुद्रांत उदक घालीत नाहीं. विषयाची भोगावस्था संपली कीं हाच आनंद स्वस्थानीं गुप्त होतो.

बा भारतीय हृदया! अमृतपानानें जेथें भक्त सुखी होतात, तेथें चल! सांवळा श्वेतांबरधारी भक्तचकोरचंद्र साई जेथें आकाराला आला, अमृतभाग्यांत वैकुंठांत नांदणारा भगवान् केवळ भक्तांकरितां–त्यांना स्वकर्तव्याची जाणीव देण्याकरितां ज्या पवित्र भूमींत अवतरला, त्या शिरडी गांवांत, त्या योगेश्वराच्या समाधीवर त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशीं प्रेमांजली वहाण्यास चल.

काय सांगूं! जगज्जीवन, गोविंद, आनंदचंद्र, श्री साई, देहधारी आज दिसत नाहीं! अगणित भक्तांना मंगल निधि देऊन सुखासनावर आरूढ केलें! असंख्य लोकांना जातीचा भेदभाव न धरतां श्री गीता–भागवत–रामायणासारख्या उच्च तत्त्वाच्या ग्रंथांतील बीज–सर्वांच्या हृदयांत पेरून भागवत धर्माच्या–मूलतत्त्वाची मूर्तमेढ रोंवली! राम–रहीम एक आहेत, हा अद्वैत सिद्धांत पटवून दिला! व सर्वांना सारखें लेखून प्रेमभक्तीचा पाया घालून आचारणांत आणला! तो भक्तवत्सल प्रेमप्रभू श्रीसाई आज शिरडींत देहधारी दिसत नाहीं. धन्य तेच, कीं ज्यांना त्यांचा सहवास लाभला.

दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर मंगळवारीं दुपारीं सुमारें २ वाजून ३० मिनिटांनीं, चैतन्याची ज्योत, आनंदाची प्रभा अंतरिक्षांत सर्वत्र पसरून, हा दुस्तर भवसागर तरून जाण्याला स्वलीलाधारी 'सांई'नाथ नौका मागें ठेवून सांवळा मनमोहन श्रीसाईप्रभो ता. १५ आक्टोबर १९१८ सालीं निजधामास गेला. त्या वेळेस एकादशी लागली होती. मर्यादा ओलांडून सीमोल्लंघन केलें.

श्रीसाईची लीला तेच जाणें! "अरे आतां मला इथें (मशीद) बरें वाटत नाहीं; वाड्यांत (बापूसाहेब बुट्टीचे दगडी वाड्याचा उल्लेख श्रीबाबा 'दगडीवाडा' 'वाडा' ह्या शब्दानें करीत) घेऊन चला म्हणजे बरें वाटेल' हीच शेवटची आज्ञा करून बयाजीच्या अंगावर प्राण सोडला.

श्रीबाबांनीं महासमाधीपूर्वीं तेथील सर्व मंडळीस घरोघरीं जेवावयास पाठवून दिलें. भक्त हृदयांची किती काळजी! प्रभूराया आतां तुला कुठें रे शोधूं! पहावेंसें वाटतें रे! देवा, कडकडून मिठी मारावीशी वाटतें! देवा, ह्या चर्मचक्षूला एकदां तरी आपलें मुखकमल दाखीव ना!

देवाचा (बाबा) श्वास हलका होऊं लागला, भागोजीचें लक्ष गेलें, व त्यांनीं नानासाहेब निमोणकर खालीं बसले होते त्यांना सांगितलें. नानासाहेब पाण्याची झारी घेऊन पाणी पाजूं लागले, तों तें पाणी तोंडांतून बाहेर येऊं लागलें. त्यासरशीं त्यांनीं 'देवा' म्हणून मोठ्यानीं किंकाळी मारली. श्रीबाबांनीं एकदां डोळे उघडून पाहिलें व हलकेंच 'आ' म्हणून होकार दिला व प्रयाण केलें. ज्योतींत ज्योत मिळाली व जेथें श्री गोपालकृष्णाची मूर्ती स्थापण्याचा बेत होता तेथेंच श्रीची समाधि झाली; देहाची मर्यादा संपली, आत्म्याची–जीवाची नव्हे.

निर्याणाचे पूर्वीं ४।५ दिवस सोनीचे आईला 'आतां मला मशिदीचा कंटाळा आला, चावडीचा कंटाळा आला, आतां मी वाड्यांत जाऊन बसेन; तेथें भेट. लोक माझा सांभाळ करतील.' असें म्हणाले.

जोगांच्या ताईला ४।५ वर्षांपूर्वीं हात धरून आणून सांगितलें कीं 'हीं हगदोडीची जागा माझी आहे. इथें दगडी इमारत होईल तेथें मी बसेन.'

बा! जीवा!! बाबा दिसत नाहींत म्हणून बाबा गेले म्हणतोस ! वेड्या, ते सर्वत्र आहेत, ते आपणांस पहात आहेत! अरे, महासमाधि घेतल्यानंतरसुद्धां त्यांनीं ठिकठिकाणीं दृष्टांत दिले. सकाळीं लक्ष्मणभटाला दृष्टांतांत येऊन सांगितलें कीं 'तो बापूसाब निजला आहे; चल उठ, माझी काकड आरती कर,' त्याप्रमाणें लक्ष्मणभटांनीं स्नान करून बुधवारीं सकाळीं मशिदींत जाऊन देहाची पूजा केली.

पंढरपूरला मंगळवारीं दासगणूचे दृष्टांतांत जाऊन सांगितलें कीं "मशीद पडली माझे अंगावर 'बख्खळ' फुलें घालावयास या."

भगवंतालाच भक्तांची काळजी. आईलाच बाळाची जाणीव असते. मरणाच्या द्वारांत असतांना शेवटच्या घडीला लक्ष्मीबाई पाटलीणीला ९ रुपये काढून दिले.

"बाळांनो, मी जातों आमुच्या गांवा ! तुम्ही सर्व मात्र नवविधा भक्ति–वा भक्तीचीं ९ साधनें स्मरणांत ठेवा;" हाच बोध केला.

(१) सत्पुरुषांची संगती १ लें साधन.

(२) भगवत्–कथा–गायन.

(३) भगवत्–गुणानुवाद.

(४) उपनिषद्रूप भगवद्वाणीचें व्याख्यान करणें.

(५) निःष्कपट अंतःकरणपूर्वक भगवद्बुद्धीनें सदा गुरुशुश्रुषा करणें.

(६) पुण्यकर्माविषयीं स्वारसी बुद्धि असणें. यमनियमादिकांचें अनुष्ठान करणें आणि भगवत्–पूजेचे ठायीं तत्परता राखणें.

(७) भगवत् मंत्राची सांग उपासना करणें.

(८) सर्व भूतांचे ठिकाणीं भगवद्भाव पहाणें. देवापेक्षांहि भगवद्भक्तांची विशेष पूजा करणें. शमदमादि साधनद्वारां बाह्य विषयांचे ठायीं वैराग्य धरणें.

(९) ब्रह्म विचार करणें.

हीं ९ साधनें-धनाची पेटी बाबांनीं ( विष्णूनें ) लक्ष्मीच्या हातीं बाळांना देण्याकरितां हवालीं केली असें नाहीं का ?

अशी ही नवविध साधना भक्ति जो कोणी पुरुष अगर स्त्री करील त्याला भगवंताचे ठिकाणीं प्रेमलक्षणा भक्ती उत्पन्न होईल. अनन्यभक्तीनें पूर्वी महत् पातकें जरी झालेलीं असलीं तरी अग्निस्पर्शानें जशा कापसाच्या पर्वतमय राशी क्षणांत भस्म होतात, तशीं हीं सर्व पातकें भस्म पावतील. हाच शेवटचा गोड उपदेश श्रीमाऊलींनी आपणां सर्वांना, रुपये नऊ देऊन केला असें मला वाटतें !

बा :मित्रा ! पुण्यतिथीचा सोहळा पहाण्यास चल. बाबा देहानें गेले, पण स्मरणानें अगदीं जवळ हृदयांत आले. आणि स्मरण हेंच, जीवा, आपलें जीवन आहे, तर विस्मरण हेंच मरण आहे. आनंद आणि तृप्ती तुझ्याजवळ, तुझ्या अंतरांतच आहे, परंतु त्याच्यावरील एक आवरण तूं दूर कर म्हणजे 'बाबांचें' तुला दर्शन होईल. त्या आवरणामुळेंच 'देव जवळीं अंतरीं । भेटी नाहीं जन्मवरी ।'

उत्तम पीक येण्यास भूमि तयार असली पाहिजे. खडकावर अगर उखर भूमीवर मुसळधार पजन्य पडला तरी त्याचा परिणाम कांहींच होत नाहीं. पर्जन्य पोटांत सांठविणारी जमीन असली पाहिजे. तिची मशागत-मेहनत झाली पाहिजे. तरच बीजांकुरोत्पत्ति होऊन फलप्राप्ती होईल; व सर्वांना समाधान लाभेल.

नरदेह-भूमीसुद्धां मेहनत करून, मशागत करून चांगली ( पुण्य ) केली पाहिजे. अहंकार, तज्जन्य इच्छा आणि त्या इच्छांची तृप्ति यांचा मार्ग धरला तर अचुक नरकास जाऊन पोहोंचला ! मग अशा प्राण्याची पुण्यतिथी कशी साजरी करावी ? का करूंच नये ? प्रत्येक मानव आपआपल्या नातेवाईकांची पुण्यतिथी साजरी करतो-स्मरण करतोच; तिला श्राद्ध म्हणतात. उलट अहंकार पायाखालीं चिरडून टाकून, निरहंकारता निरिच्छता आणि ज्ञान यांनीं चोखाळलेल्या मार्गानें पुण्यवान लोकांचीच-सत्पुरुषांची पुण्यतिथी साजरी करतात.

श्राद्ध आणि पुण्यतिथी यांच्या विधीमध्यें सुद्धां फरक आहे. पुण्यतिथी सत्पुरुषाचीच करतात; हा विधि 'नागरखंडा' मध्यें सांगितला आहे. तो असा

चार ब्राह्मणांना क्षण देण्यांत येतो. या चार ब्राह्मणांची योजना. ( १ ) गुरु ( २ ) परमगुरु ( ३ ) परमेष्ठीगुरु ( ४ ) परात्परगुरु.

( १ ) गुरु-श्रीसाईनाथमहाराजस्थानीं.

( २ ) परमगुरु-श्रीबाबांचे गुरुस्थानीं.

( ३ ) परमेष्ठीगुरु-ब्रह्मदेवस्थानीं.

( ४ ) परात्परगुरु-परमेश्वरस्थानीं.

अशी विधिपूर्वक करावी. या विधींत गुरूंना ब्रह्मीभूत न म्हणतां 'विश्वरूपधर असा जो आचार्य त्यांस' असा संकल्प करावा. 'वरील ब्राह्मणांना स्थानापन्न केल्यानंतर त्यांचें पादप्रक्षालन करून त्यांजकडून आचमन करवून पुरुष सूक्तानें त्यांचें पूजन करावें.

आनंदमानंदकरं प्रसन्नं ज्ञानस्वरूपं निजबोधरूपं ।
योगींद्रवंद्यं भवरोगवैद्यं श्रीमद्‌गुरुं नित्यमहं नमामि ॥

या श्लोकानें त्यांची प्रार्थना करण्यांत यावी. नंतर मंडलें करून त्यांचीं पानें मांडून पंचपक्वान्नांचें भोजन द्यावें. ब्राह्मणांचें भोजन झाल्यानंतर त्यांना तांबूल व वस्त्रें द्यावीं, नंतर तीर्थराजाच्या पूजेस सुरवात करावी. विधीप्रमाणें गोमयानें सारविलेल्या जमिनीवर चौरंग मांडून सभोंवती रांगोळ्या काढून चौरंगावर मांडलेल्या धान्यावर पाण्यानें भरलेला कलश ठेवावा. तेथें गंगोदकाची भावना धरून तीर्थराजाची स्थापना करावी. पुरुषसूक्तमंत्रपूर्वक पूजा करावी. त्यानंतर विधिकरणानें तो कलश मस्तकावर धारण करून ब्राह्मणांचा वेद-सूक्तांतील मंत्रघोष चालू असतां अंगावर कलशांतील पाणी सांडेल अशा बेतानें नृत्य करावें; नंतर तो कलश ( तीर्थराज ) स्वस्थानीं ठेवून पुनः कलशाची पूजा–आरती करून ब्राह्मणांना प्रदक्षिणा घालून कलशामधील तीर्थ प्रथम ब्राह्मणांना देऊन नंतर आपण प्राशन करावें. शेवटीं सर्व कर्म ब्रह्मार्पण करून हा 'आराधनविधि' संपवावा.

हा विधि शिरडींत केला जातो.

पुण्यतिथि–पुण्यवान प्राण्याच्या स्मरणानें त्यांच्या गोड आठवणीनें तन्मय होऊन सुखानंदांत रमून जाणें.

जेथें जन्मच नाहीं तेथें मरण कोठचें ? आणि जन्म–मरण नाहीं तेथें पुण्यतिथि कोणाची ? ह्या सर्व अवस्था आहेत.

माझा जीवींचा जिव्हाळा श्रीसाई–विठू चर्मचक्षूला दिसत नाहीं, पण ज्ञानचक्षूला अवगत आहे. माझ्या बाबांनीं कीर्तनें केलीं नाहींत, प्रवचनें दिलीं नाहींत, आणि पुस्तकें-ग्रंथ लिहिले नाहींत. परंतु त्यांचें आचरण हेंच त्यांचें खरें प्रवचन, कीर्तन; व त्यांचें अनुकरण हेंच साधकानें त्यांना करावयाचें खरें नमन. त्यांच्या दरबारांत मौन हीच राजभाषा होती व त्यांचा कृपाकटाक्ष खरा प्रसाद होता.

मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें । अलौकि नोहावें । लोकांप्रती । हा त्यांचा दंडक होता आणि 'अल्लामालीक', सदैव तोंडा । अढळपदीं हरिरूप होऊन आधींच राहिलेले होते. बा जीवा ! लोकलोचनानंद, त्रिभुवनसुंदर, भगवान् श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथि–उत्सव–सोहळ्या दिवशीं 'शेवटचा दीन गोड व्हावा' म्हणून प्रभुचरणांवर हृदयसुमनें वहाण्यास शिरडी मुक्कामीं जाऊं या !

भक्तवत्सला ! शामसुंदरा ! तुला कोठें पाहूं ! कोठें हुडकूं ! प्रभो, ये रे ! सांवळ्या ये रे ! मला भेट दे रे ! देवा साईनाथा, आलिंगन देऊन तुझा वरदहस्त माझे माथां ठेव ! दीनदयाळा, एक वेळच म्हण कीं "तूं माझा आहेस !" सत्यनाथा, सद्‌गुरुप्रेमानें माझें हृदय डवरूं दे ! नयनांतील श्रीसाईप्रेमप्रभू प्रेमाचे नंदादीपांत नयनीं सतत दिसूं दे ! सर्वांचें मंगल कर हीच तुझ्या चरणीं विनंती.

आई ! साईमाऊली ! ! सर्वस्वीं सर्वांगानें तुझाच असतां; कोणची अंजली तुझ्या समाधीवर वाहूं ?

"हरि ॐ तत्सत्"

# दिसो साइबाबा गुरूचे ठिकाणीं ।

महाराष्ट्र भूमींत कित्येक संत तसे साधु निर्माण झाले अनंत
किती लोककल्याण केलें तयांनीं महा संकटीं रक्षिला धर्म ज्यांनीं १
किती कार्य तें भव्य ज्ञानेश्वराचें तुकाराम वा श्रीसमर्थादिकांचे
पहा निर्मिली ज्ञानगंगा तयांनीं किती तुष्टले लोक होऊनि ज्ञानी २
गुरू साईबाबा जणूं मायबाप करूंया तयांचीच सेवा अमूप
कृपेचीच मूर्ती – दयेचा समुद्र, कधीं चिंतिलें नाहिं कोणा अभद्र ३
किती भक्त दुःखांतुनी मुक्त केले किती संकटांतूनिया सोडवीले
किती रोगियांना दिलें जीवदान गुरू साइबाबा किती धन्यवान ४
सदा घोष चालेच मंत्राक्षरांचा किती शुद्ध झाली तयांचीच वाचा
कुणाचीहि निंदा तसा द्वेष तोही कधींही न केला असे साधुता ही ५
तपानेंच ही श्रेष्ठता मेळवीली गुरू माउलीची कृपा प्राप्त झाली
पहा अर्पुनी भाव निष्ठा गुरूला स्वतःजाहले सद्‌गुरू काय लीला ६
असे सत्य विश्वांत जें जें म्हणोनी तसें शीव सर्वत्र गेलें फुलोनी
किती रम्य सौंदर्य पृथ्वीवरी बा तिन्हीही मिळोनीच हे साईबाबा ७
मिळे सद्‌गती सद्‌गुरूचे कृपेनें म्हणोनी करावा गुरू शीघ्रतेनें
मनापासुनी श्री गुरूपूजनाची धरा कामना शेवटीं ती सुखाची ८
गुरू हीच माता पिता हा गुरूच गुरू देव साक्षात सर्वस्व तोच
गुरू अन्नदाता, गुरू ज्ञानदाता महासंकटीं सद्‌गुरू हाच त्राता ९
गुरूच्यावरी पूर्ण श्रद्धा असावी अती नम्रतेनेंच सेवा करावी
गुरू दाविती मार्ग त्यानेंच जावें असे यांत कल्याण ध्यानीं धरावें १०
गुरू हाच ब्रह्मा, असे विष्णु तोच गुरू सांब तैसा परब्रह्म तोच
गुरू भक्तिभावें म्हणोनी पुजावा गुरू पूजनानें घडे ईशसेवा ११
दिसो साइबाबा गुरूचे ठिकाणीं सदा नांव त्यांचें वदो गोड वाणी
घडावी गुरूचीच सेवा अखंड मनीं फार माझ्याच इच्छा उदंड १२

शं. बा. दाते

# संतांच्या उद्बोधक आख्यायिका

## शिरडीच्या समाधिमंदिराचा इतिहास

श्रीसाईबाबांच्या समाधीची स्थापना ज्या मंदिरांत करण्यांत आली आहे त्याची हकीकत थोडी विलक्षण आहे. शिरडीस एकदां दीक्षितांच्या वाड्यांत साईभक्त श्री. बुटी यांचा मुक्काम होता. त्यावेळीं त्यांना स्वप्नांत श्रीसाईनीं असा संदेश दिला कीं 'तूं या ठिकाणीं एक भव्य वाडा बांध.' त्याचवेळीं योगायोगानें दुसरे साईभक्त शामा यांनाहि असाच दृष्टांत झाला. सकाळीं उठल्यावर शामाची थोडी चिंताग्रस्त मुद्रा पाहून बुटी यांनीं त्याला त्याचें कारण विचारलें. शामा म्हणाला, "बाबांनीं स्वप्नांत येऊन येथें वाड्याऐवजीं भव्य देऊळ बांधा, मी तुमच्या सर्वांच्या मनःकामना पूर्ण करीन असें सांगितलें." मग दीक्षित वगैरेंच्या सल्लामसलतीनें बुटींनीं मंदिर बांधण्याचा निश्चय ठरविला. बाबांनीं या गोष्टीला परवानगी दिली. बापूसाहेब जोग इमारतीच्या कामाला लागले. मुरलीधराच्या सुंदर मूर्तीपुढें चांगला सभामंडप असावा अशी कल्पना सुचल्यामुळें पुन्हां बाबांच्या परवानगीचा प्रश्न आला. बाबा त्यावेळीं लेंडीबागेंत निघाले होते. त्यांना थांबवून याबाबत विचारण्यांत आलें. थोडा विचार करून बाबा म्हणाले, 'आपल्या इच्छेप्रमाणें सर्व मंदिर तयार करा. मूर्तीची स्थापना करण्याची मात्र घाई करूं नका. मी स्वतःच तेथें येऊन राहीन. मला ही जागा फार आवडली आहे. नेहमीं येथेंच कायमचें वास्तव्य करून तुम्हां भक्तांसह येथें क्रीडा करावी असें मला वाटतें. आजच्या शुभ मुहूर्तावर तुम्ही वाड्याच्या कामाला सुरवात करा.'

बाबांच्या इच्छेप्रमाणें लगेच नारळ फोडून मुहूर्त झाला. कांहीं वर्षांच्या अवधींत मंदिराचें काम पुरें झालें. मुरलीधराची सुंदर मूर्ती घडवून आणली. तिची स्थापना बाबांच्या हातून व्हावी अशी बुटींची फार इच्छा होती. पण श्रीसाईची लीला अघटित होती. बाबा याच वेळीं आजारी पडले. दिवसेंदिवस त्यांची प्रकृति खालावली व अंतसमयीं 'मला बुटींच्या मंदिरांत नेऊन ठेवा' असा स्पष्ट आदेश त्यांनीं दिला. तेव्हां या भव्य मंदिरांत बाबांची समाधि बांधण्यांत आली. कृष्णावतार श्रीसाई यांची मुरलीधराच्या जागीं प्रतिष्ठापना झाली.

× × ×

## शेख महंमदाचा अनुताप

तारिति न कीर्तिच्या जो नळवे त्या मुसळ मानवा नावा।
हर्षें शेख महंमद भगवज्जन मुसलमान वानावा ॥ —मोरोपंत

चांभारगोंदें या गांवापासून सई वाहिरें या गांवीं एका खाटकाच्या पोटीं शेख महंमद याचा जन्म झाला. पंधरा सोळा वर्षांचा असतांना शेख महंमद बापाच्या आज्ञेवरून बकरें कापण्यासाठीं गेला. असलें हिंसाकर्म स्वतःच्या हातानें करण्याचा त्याचा हा पहिलाच प्रसंग होता. हातांत सुरा घेऊन तो बकऱ्याजवळ उभा राहिला. त्या गरीब प्राण्याच्या केंविलवाण्या ओरडीनें त्याचें अंतःकरण द्रवून गेलें. जातीचा मुसलमान, खाटकाच्या वंशांतला, तेव्हां परंपरागत निर्दयपणा त्याच्या आंगांत वस्तुतः खिळलेला असायचा. पण असें असतांहि शेख महंमदाच्या हृदयास पाझर फुटला. कापण्याचें दुःख कसें होतें हें पाहण्यासाठीं त्यानें हातांतल्या सुरीनें आपलें स्वतःचें बोट थोडेंसें कापून पाहिलें. त्याबरोबर त्याला परम वेदना झाल्या. जरासें बोट कापल्याबरोबर जर इतके क्लेश होतात तर त्या बिचाऱ्या मुक्या प्राण्याची मान चिरली जात असतां त्याला किती दुःख होईल हा विचार त्याच्या कोमल अंतःकरणांत मूर्तिमंत उभा राहून, त्याला आपल्या वृत्तीचा तिरस्कार आला. प्राण गेला तरी यापुढें हिंसाकर्म करायचें नाहीं अशी शपथ वाहून त्यानें हातांतली सुरी लांब भिरकावून दिली.

हाच शेख महंमद पुढें शेख महंमदबाबा या नांवानें श्रेष्ठ संत म्हणून प्रसिद्धीस आला. पुढें 'निष्कलंक प्रबोध' नांवाच्या आपल्या ग्रंथांत शेख महंमदबाबा एका ठिकाणीं लिहितात—

पडताळुनी सुऱ्या । पशु विदारिती ॥
रडे बोंबा मारिती । कापितां बोट ॥ १ ॥
मेल्या रांडा पोरें । रडती परोपरी ॥
नेणती अविचारी । परावें दुःख ॥ २ ॥
अहिंसा विज्ञान । दुःखीं सुख कळलें ॥
आत्मज्ञान फळलें । शेख महंमदा ॥ ३ ॥

× × ×

## एकनाथांनीं जांवयाला ताळ्यावर आणला

प्रसिद्ध संत एकनाथ यांना गंगाबाई नांवाची मुलगी होती. तिचा विवाह चिंतामणि उर्फ विश्वंभरबुवा यांच्याशीं झाला होता. चिंतामणिबुवा नाथांचे घरींच पैठणास राहात असत. चिंतामणिबुवा मोठे विद्वान् होते. परंतु त्यांस बाहेरख्यालीपणाचें व्यसन लागल्यामुळें गंगाबाईकडे त्यांचें दुर्लक्ष्य होत असे. गंगाबाई चांगली सुशिक्षित होती. तिनें आपल्या पतीस या दुर्व्यसनापासून परावृत्त करण्याकरतां शक्य तेवढा प्रयत्न करून पाहिला. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं तिनें ती गोष्ट नाथांस कळविली. नाथांचें प्रपंचाकडे फारसें लक्ष नसल्यानें असल्या लौकिक गोष्टी कोणीतरी मुद्दाम सांगाव्या तेव्हां त्यांना त्या कळत असत. आपली मुलगी इतकी सुंदर व सुशील असतां तिच्या नवऱ्याचें तिजवर प्रेम नाहीं हें पाहून नाथांना सखेदाश्चर्य वाटलें. चिंतामणिबुवा इतरत्र कसेहि वागत असले तरी नाथांपुढें ते भिऊन वागत.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं जेवण झाल्यावर चिंतामणिबुवा बाहेर जाणार तोंच नाथांनीं त्यांना हांक मारून बोलाविलें व म्हटलें, 'भगवद्गीतेचा पहिला अध्याय आज तुमच्या मुखानें श्रवण करावा अशी इच्छा आहे.' असें म्हणून लागलीच भगवद्गीतेची पोथी त्यांनीं आणून बुवांच्या समोर ठेवली. चिंतामणिबुवांचा मग नाइलाजच झाला. बुवांनीं अर्थ सांगावा, नाथांनीं शंका घ्यावी, तिचें निरसन बुवांनीं करावें, अशा प्रकारें पहिला अध्याय संपण्यास मध्यरात्र उलटून गेली! या रीतीनें अठरा दिवस अठरा अध्याय नाथांनीं बुवांकडून वाचून घेतले. तेवढ्या दिवसांच्या सत्समागमानें आणि गीतापठणानें बुवांची चित्तवृत्ति पालटली, त्यांचा बाहेरख्यालीपणा बंद झाला आणि ते गंगाबाईवर मनापासून प्रीती करूं लागले. त्यानंतर एकदोन वर्षांत गंगाबाईला मुलगा झाला. हा मुलगा म्हणजेच प्रसिद्ध मराठी कवि मुक्तेश्वर हा होय.

× × ×

## अमृतरायाचें भाग्य

प्रसिद्ध कवि अमृतराय हे स्वभावानें रंगेल होते. तथापि वैराग्य व परमार्थ यांकडे त्यांचा अतिशय कल होता. 'वैराग्यभाग्यासारखें भाग्य नाहीं' हें त्यांचें पद फार प्रसिद्ध झालें. तें एका बैराग्याच्या कानीं आलें. तेव्हां स्वतः अमृतरायाच्या अंगीं वैराग्य किती आहे हें पाहण्यासाठीं तो बैरागी औरंगाबादेस आला. तेथें अमृतराय मोठा झोंकदार पोषाख करून झोंपाळ्यावर बसले आहेत असा प्रकार दिसतांच त्याला मोठें आश्चर्य वाटलें, व "वैराग्यभाग्यासारखें भाग्य नाहीं' हें पद तुमचेंच ना?" म्हणून त्यानें अमृतरायांना विचारलें. अमृतराय 'होय' म्हणाले. तें ऐकतांच बैराग्याला मोठा राग आला. तो म्हणाला, 'बोलणें सोपें पण वागणें कठीण आहे. आपण भाग्याचा खुशाल उपभोग घ्यावा आणि दुसऱ्यांना वैराग्याचा उपदेश करावा यांत अर्थ काय?' अमृतराव म्हणाले, 'बुवाजी! हें देहप्रारब्ध आहे. मी कुठेंहि असलों तरी सुखाचे मार्ग माझ्या मागोमाग येतात—'

बैरागी म्हणाला, 'असें काय? आपलें देहप्रारब्ध आपल्याबरोबर आहेच. मग आपण माझ्याबरोबर रानांत चला. मग बघूं या तुमचें प्रारब्ध!'

अमृतराय या गोष्टीला लगेच कबूल झाले. पुढें ते दोघेहि एका अरण्यांत गेले. तेथें अमृतरायांना बसवून गोसावी गांवांत भिक्षा मागण्यासाठीं निघून गेला. इकडे अमृतरायांचा एक शिष्य मोठा सरकारी कामदार होता. तो त्या मार्गानें येत होता. त्यानें अमृतरायांना रानांत पाहतांच तेथेंच मुक्काम केला. त्यांच्या चाकरांनीं अमृतरायांना गादी वगैरे आणून दिली. तीवर त्यांना झोंपवून चाकर त्यांचे पाय चेपूं लागले! थोड्या वेळांत बैरागी भिक्षेहून आला. पाहतो तों अमृतरायांचा हा थाट चाललेला व सगळी बडदास्त ठेवलेली! तेव्हां अमृतरायांचें म्हणणें त्याला पटलें आणि तो त्यांची क्षमा मागून तिथून निघून गेला.

'जो निश्चय धरूनि बैसतो। त्याला घरिं बसल्या राम देतो॥' हे अमृतरायांचे उद्‌गार स्वानुभवाचेच आहेत!

× × ×

## कविता कचरा म्हणून जाळून टाकली!

संत सोहिरोबा यांच्या कवितेचा बराचसा भाग त्यांच्या बहिणीनें लिहून ठेवलेला आहे. हिला चांगलें लिहितां वाचतां येत असे. सोहिरोबा ब्रह्मानंदांत स्वयंस्फूर्तीनें ज्या कविता रचीत त्या सर्व ही बाई सुवाच्य लिहून ठेवी. सोहिरोबांची जी कविता उपलब्ध आहे तिचें सर्व श्रेय त्यांच्या या बहिणीला आहे. तिनें याबाबत महाराष्ट्रास कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. एका अपसमजुतीमुळें मात्र सोहिरोबांची पुष्कळशी कविता नष्ट होऊन गेली. असें सांगतात कीं त्यावेळीं कागद फार महाग असल्यानें सोहिरोबांना ते विकत घेण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्यामुळें त्यांच्या बहिणीनें कांहीं कविता झाडांच्या पानांवर कोरून तीं पानें एका खोलींत रचून ठेवलीं होतीं. एकदां घर झाडतांना हीं पानें म्हणजे वाळलेला पालापाचोळा आहे या समजुतीनें, सोहिरोबांच्या वृद्ध आईनें तीं गोळा केलीं आणि जाळून टाकून, खोली स्वच्छ झाडून ठेवली! या विचित्र योगामुळें सोहिरोबांची ती सगळी कविता अक्षरशः जळून गेली।

× × ×

## जयरामस्वामींचा खराटा

रामदास पंचकांतील एक साधु श्रीजयरामस्वामी यांच्याविषयीं एक मजेदार अख्यायिका आहे. एका दिवशीं सकाळीं हातांत खराटा घेऊन आपले गुरु श्रीकृष्णाप्पास्वामी यांच्या समाधीभोंवतालचा कचरा जयरामस्वामी लोटून काढीत होते. त्यावेळीं विजापूरच्या बादशहाचा एक कारकून पालखी घेऊन तेथें आला. त्यानें स्वामींस नमस्कार करून सांगितलें, "बादशहानें आपणांस बोलाविलें आहे." स्वामींनीं विचारलें, "बादशहाचें मजपाशीं काय काम आहे?" कारकून म्हणाला, "दररोज कोणातरी सत्पुरुषाचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण करायचें नाहीं असा बादशहाचा नियम आहे. सध्यां सरकार स्वारी चितळी येथें आहे. तरी आपण येऊन त्यांना दर्शनाचा लाभ द्यावा. स्वामींनीं प्रश्न केला, 'बादशहास आमची माहिती कोणी दिली?' त्यावर कारकून म्हणाला, 'चितळीस आल्यावर 'येथें जवळपास कोणी सत्पुरुष आहे काय?' अशी बादशहानें चौकशी केली. तेव्हां लोकांनीं 'येथून चार कोसांवर वडगांवीं जयरामस्वामी या नांवाचे भगवद्‌भक्त आहेत' अशी माहिती दिली. त्यावर बादशहानें आपणांस घेऊन येण्याची मला आज्ञा दिल्यावरून मी येथपर्यंत आलों आहें. तरी या पालखींत बसून आपण निघावें अशी विनंति आहे.'

मग स्वामींनीं कृष्णप्पास्वामींच्या समाधीस नमस्कार केला, हातांतला खराटा पालखींत ठेवला आणि स्वतः पालखीबरोबर पायींच निघाले !

स्वामी चितळीस येतांच बादशहा आपल्या प्रधानासह त्यांना सामोरा जाऊन आपल्या तंबूंत घेऊन आला. नंतर बादशहानें स्वामींना म्हटलें, ' आपल्यासाठीं पालखी पाठविली. असें असतां आपण पालखींत न बसतां आंत खराटा ठेवला याचें कारण काय ? '

स्वामी म्हणाले, ' आमच्यापेक्षां या खराट्याची योग्यता अधिक आहे ! कारण असें कीं समाधीच्या भोंवतालचा कचरा लोटतांना याचें शरीर जसें झिजतें तसें कांहीं आमचें झिजत नाहीं ! '

× × ×

## सात पिढ्यांची शपथ !

संतचरित्रकार महीपति यांचें नांव महाराष्ट्रांत सर्वविश्रुत आहे. ताहराबादचे हे कुळकर्णी. त्या गांवचा जोशीपणाहि यांच्याकडेच होता. ताहराबाद हा गांव एका मुसलमान जहागिरदाराकडे होता. त्या मुसलमानाच्या कचेरींत महीपतींस नित्य जावें लागत असे. एके दिवशीं कचेरींतून येऊन स्नान करून ते देवपूजेस बसले असतां, जहागिरदाराचा शिपाई त्यांना बोलावण्यासाठीं आला. ' देवपूजा आटोपतांच येतों ' असा निरोप त्याच्याजवळ महीपतींनीं सांगितला. इतक्यांत आणखी दोन बोलावणीं आलीं. तो यवन शिपाई त्यांना कांहीं उणे-अधिक शब्द बोलला. तें ऐकून महीपतींस फार वाईट वाटलें. पूजा आटोपल्यावर ते जहागिरदाराच्या वाड्यांत गेले. तिकडचें काम संपवून परत आल्यावर, कानास लेखणी होती ती देवापुढें ठेवून त्यांनीं शपथ वाहिली कीं, ' आजपासून गांवकामासाठीं लेखणी हातांत धरणार नाहीं.' ही शपथ त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं अद्यापि पाळली असून सात पिढ्यांपर्यंत ती तशीच पाळली जावयाची आहे !

× × ×

## संत :

मध्यप्रदेशांत वरोरा या ग

खेडें आहे. या ठिकाणीं शंभर

जातींतील एक प्रसिद्ध संत होऊन गेले. यांनीं पारडास श्रीगोपालकृष्णाच्या मूर्तीची स्थापना केली आहे. त्यासंबंधानें एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. ती अशी —

वरोऱ्यापासून सहा कोसांवर वणी नांवाचें गांव आहे. तेथें 'कृष्णा' या नांवाचा एक घडशी राहात असे. त्याला स्वप्नांत असा दृष्टांत झाला कीं 'गोपालकृष्णाची मूर्ति घडवून ती पारडी येथें नगाजीमहाराजांस नेऊन दे.' या स्वप्नांतल्या गोष्टीला कांहीं अर्थ नाहीं, अशा समजुतीनें कृष्णानें तिकडे दुर्लक्ष केलें. पुढें महिनाभर हें स्वप्न त्याला पडत होतें, व तोहि तिकडे दुर्लक्ष करीत होता. पुढें त्यास चौथरा ताप येऊं लागला. पुष्कळ उपाय केले तरी ताप कमी होईना. मग त्याला सहजच शंका आली कीं, आपणांस मागें स्वप्न पडत होतें त्याप्रमाणें आपण वागलों नाहीं, म्हणून तर हा ताप आपल्या मागें लागला नसेल ना? ही शंका उत्पन्न होतांच नगाजीमहाराजांना भेटण्यासाठीं तो पारडीस जाण्यास निघाला. पारडी येथें महाराजांना भेटून त्यानें घडलेला सर्व वृत्तांत त्यांना निवेदन केला. महाराज म्हणाले, 'तुला द्यायला मजपाशीं पैसा मुळींच नाहीं. फक्त एक पैसा आहे तेवढा पाहिजे तर देतों!' कृष्णानें तो पैसा घेतला व आपल्या गांवीं येऊन मूर्ति घडविण्यास प्रारंभ केला. त्याच दिवसापासून औषधाशिवाय त्याचा ताप गेला! मूर्ति कशी घडवायची, नाक कसें असावें, डोळे कसे असावेत, ओटें कशीं घडवावीं, कोणता भाग किती उंच, कोणता किती सखल वगैरे माहिती, स्वप्नांत दृष्टांतानें त्याला मिळत असे असें म्हणतात. ही मूर्ति अत्यंत मनोहर झालेली आहे.

अशा रीतीनें गोपालकृष्णाची स्थापना पारडी येथें झाल्यापासून जन्माष्टमीचा कडाक्याचा उत्सवहि तेथें सुरू झाला. आजतागायत हा वार्षिक उत्सव तेथें चालू आहे. भर पावसाळ्यांत हजारों भाविक उत्सवाप्रीत्यर्थ पारडीस जात असतात.

या उत्सवाच्या वेळीं तिथें एक चमत्कार अद्यापि होत असतो असें म्हणतात. देवळाच्या सभामंडपांत जेव्हां लोकांची एकच गर्दी उसळून जाते व भजनाचा एकच कल्लोळ होतो, तेव्हां गोपालकृष्णाच्या मूर्तीच्या अंगावर घर्मबिंदू येऊन ते मोत्यांसारखे चमकत असलेले दिसतात!

# संतकवींच्या सहवासांत

संतांचीं उपदेशपर अथवा प्रार्थनापर काव्यें सर्वप्रसिद्ध असतात; पण प्रसंगानुरोधानें त्यांनीं केलेलीं इतर कवनें मात्र फारशीं माहीत नसतात. अशा कवनांत विविध रस आढळून येतात आणि मानवी स्वभावाचे नमुनेहि उत्तम रीतीनें व्यक्त झालेले असतात. अशा कांहीं कवितांचा परिचय येथें करून दिलेला आहे. वाचकांना या कविता मनोरंजक आणि उद्‌बोधक वाटतील.

## तुम अच्छा हुका पीना

श्रीसोहिरोबा यांचें ग्वाल्हेर येथें बरेंच दिवस वास्तव्य होतें. एकदां ते आपल्या बिऱ्हाडीं भगवद्भजन करीत बसले असतांना एक टवाळ इसम तिथें आला व त्यांच्यासमोर बसून निर्लज्जपणें तंबाखूचा धूर त्यांच्या तोंडावर मुद्दाम जाईल अशा प्रकारें हुक्का पीत बसला! सोहिरोबांची मनःशांति ढळावी व त्यांना चीड आणावी म्हणून मुद्दाम ही गोष्ट त्या टवाळखोरानें चालविली होती. पण सोहिरोबा मुळींच रागावले नाहींत! ते शांतपणें त्याच्याकडे सहास्य मुद्रेनें पहात तात्काळ पद रचून म्हणाले,

तुम अच्छा हुक्का पीना ॥ धृ ॥
ब्रह्मरंध्रमें त्रिकूट चिलिम। प्रान अपानसें दमपर दम लेना ॥१॥
अलख तमाखू ग्यान अगनसें। जलकर मायाधूर छोड देना ॥२॥
कहत सोहिरा सतसंग धरना। अहंमलीसें नळी खलील कर देना ॥३॥

× × ×

## घ्या तुम्ही गुर्गुडी। गुर्गुडी ॥

इथें मध्वमुनीश्वरांनीं गुडगुडी अथवा गुर्गुडी यावर रचलेली कविता देण्यासारखी आहे. गुर्गुडीवर केलेल्या रूपकांत ते म्हणतात—

घ्या तुम्ही गुर्गुडी। गुर्गुडी ॥ प्रपंच धूर हा सोडी ॥ धृ ॥
नारळ औट हाताचे। आंत जीवन सत्रावीचें ॥
धैर्य तोच मेरू म्हणती। शांति चिलिम शोभे वरती ॥
काम क्रोध तंबाकू। त्याची जाळून केली राखू ॥

ज्ञान घालुनि खडा । गुर्गुडी बोलतसे भडभडां ॥
अनुभव लावुन नळी । गुर्गुडी बोले वाणी मंजुळी ॥
ह्या गुर्गुडीचा छंद । मध्वनाथ झाला धुंद ॥

× × ×

## कर्कशा स्त्रीचें वर्णन

कवि अमृतराय यांची पत्नी मोठी कर्कशा होती. तिच्या त्रासामुळें अमृतरायांच्या मूळच्या परमार्थ वृत्तींत वैराग्याची अधिक जोराची भर पडली होती कीं काय असें सहजच मनांत येतें. आपल्या पत्नीचें वर्णन अमृतरायांनीं पुढील शब्दांत केलें आहे:—

मागे ती लुगडीं सकाप बुगडी आठ दिसां बांगडी ।
घाली ते फुगडी कधीं न रगडी फाडीतसे आंगडी ॥
खैराची सगडी तशी घडधडी तोंडाळ मोठी खुडी ।
सोन्याच्या लगडीस देखुनि रमे ऐशी महा धांगडी ॥ १

दारा देत कडी सदा बडबडी बोले महा वांकडी ।
दाणे चोरुनि फांकडी न कळतां घेते मुळे कांकडी ॥
खाते ती जशी माकडी वसवसी दांतीं दिसे खेंकडी ।
यालागी अमृतेश्वरासि रुचली गंगातिरीं झोंपडी ॥ २

× × ×

## बरें झालें देवा बाईल कर्कशा

श्रीतुकारामांची पत्नीहि कर्कश स्वभावाची होती. ‘ बरें झालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनांमध्यें ॥ ’ असे उद्गार आपल्या एका अभंगांत तुकारामांनीं काढले आहेत. संसाराकडे आपल्या पतीचें मुळींच लक्ष नाहीं हें पाहून, मुलाबाळांची व घरादाराची आबाळ चाललेली बघून तुकारामांच्या पत्नीला स्वाभाविक संताप येई. घरीं येणाऱ्या संताविषयीं तुकारामांची पत्नी कसा संताप व्यक्त करीत असे याचें त्यांनीं एका अभंगांत केलेलें पुढील वर्णन पहा—

कोण घरा येतें आमुच्या काशाला ।
काय ज्याचा त्याला नाहीं धंदा ॥
देवासाठीं झालें ब्रह्मांड सोइरें ।
कोंवळ्या उत्तरें काय वेंचे ॥
मागें पाचारितां नव्हे आराणुक ।
ऐसे येती लोक प्रीतीसाठीं ॥

तुका म्हणे रांडे नावडे भूषण ।
कांतलेसें श्वान लागे पाठीं ॥ १ ॥
न करवे धंदा । आइता तोंडीं पडे लोंदा ॥
उठिलें तें कुटिलें टाळ । अवघा मांडिला कोल्हाळ ॥
जिवंतचि मेले । लाजा वाटूनिया प्याले ॥
संवसाराकडे । न पाहती ओस पडे ॥
तळमळती यांच्या रांडा । घालिती जीवा नांवें धोंडा ॥
तुका म्हणें बरें झालें । घे गे बाईलें लिहिलें ॥ २ ॥

× × ×

## देखोनि पुराणिकाची दाढी—

ढोंग आणि धर्माचें सोंग यांवर आपल्या संतकवींनीं कडक कोरडे ओढलेले आहेत. संसारांत पूर्ण रमलेल्या माणसांची धर्माकडची ओढ किती तकलुपी असते याचेंहि मजेदार वर्णन अनेक संतांनीं केलें आहे. तुकारामांच्या अभंगांत अशीं मार्मिक वर्णनें पुष्कळ आहेत. एका अभंगांत त्यांनीं पुराणाला गेलेल्या बाईनें वर्णन केलें आहे; पुराणिकाची दाढी पाहून तिला आपल्या घरच्या बोकडाची आठवण आठवण झाली ! नंतर पुराणाकडे तिचें लक्ष राहिलें नव्हतेंच. बोकडाची आठवण येऊन तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. लोक म्हणाले ' बाई किती भाविक ! पुराण ऐकतां ऐकतां भक्तीनें अश्रुपूर दाटले तिच्या नेत्रांतून ! '

तुकाराम म्हणतातः—

देखोनि पुराणिकाची दाढी । रडे फुंदे नाक ओढी ॥
प्रेम खरें दिसे जना । भिन्न अंतरीं भावना ॥
आवरितां नावरे । खुर आठवी नेवरे ॥
बोलों नये मुखावाटां । म्हणे होता ब्यांचा तोटा ॥
दोन्ही सिंगें चारी पाय । खुणा दावी म्हणे होय ॥
मना आणितां बोकड । मेला त्याची चरफड ॥
होता भाव पोटीं । मुखा आलासे सेवटीं ॥
तुका म्हणे कुडें । कळो येतें तें रोकडें

× × ×

## मुलें लेकरें घरदार—माझें येथेंचि पंढरपूर

एक सासुबाई पंढरपूरच्या यात्रेला निघाली. जीव गुंतलेला सगळा संसारांत. तिनें सुनेला आपल्यामागें काय काय करायचें, कसें वागायचें हें सांगून ठेवलें आणि अखेर ती जायला निघाली. पण शेवटीं तिनें आपला निश्चय बदलला व ती परत येऊन घरींच राहिली! तिच्या मनाची स्थिति तुकारामांनीं अशी वर्णन केली आहे:—

परिसें गे सूनबाई । नको वेंचूं दूध दहीं ॥
आवा चालली पंढरपुरा । वेसीपासुनी आली घरा ॥
ऐकें गोष्टी सादर बाळे । करीं जतन फुटकें पाळें ॥
माझे हातींचा कलवडू । मजवांचुनि नको फोडूं ॥
वळवट क्षिराचें लिंपन । नको फोडूं मजवांचून ॥
उखळ मुसळ जातें । माझें मन गुंतलें तेथें ॥
भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ॥
भक्षीं परिमित आहारु । नको फारसी वरो सारू ॥
सून म्हणे बहुत निकें । तुम्ही यात्रेसी जावें सुखें ॥
सासूबाई स्वहित जोडा । सर्व मागील आशा सोडा ॥
सूनमुखींचें वचन कानीं । ऐकोनि सासू विवंची मनीं ॥
सटवीचे चाळे खोटे । म्यां जावेंसें इला वाटे ॥
आतां कासया यात्रे जाऊं । काय जाऊनि तेथें पाहूं ॥
मुलें लेकरें घरदार । माझें येथेंचि पंढरपूर ॥
तुका म्हणे ऐसें जन । गोवियेलें मायें करून ॥

## खरा ब्राह्मण कोण

पोकळ कर्ममार्गाचा सर्व संतांना अत्यंत तिटकारा होता, कर्मठ ब्राह्मण आणि भगवद्भक्त यांचें कधींच जमलेलें नाहीं, असें सर्व संतांच्या उद्गारांवरून स्पष्ट दिसून येतें. तुकारामानें कर्मठपणाचें अवडंबर माजविणाऱ्या ढोंगी धार्मिकांचा खरपूस शब्दांत समाचार घेतला आहे. दोनअडीचशें वर्षांपूर्वीं होऊन गेलेल्या शेख महंमदबाबांनीं कर्मठपणाची सडेतोड निर्भर्त्सना केली आहे. ते म्हणतात—

दाटून दिल्या दान घेत नव्हते भट ।
आतां झाले फळकट लुलुसपणें ॥
तोंडें बोलती वेद । नेणती त्याचा भेद ॥
करिती जगीं बोध । पाखांडाचा ॥
बोलिती एक । आचरिती अनेक ॥
नेणती विवेक । निजतत्त्वाचा ॥

'जे ब्रह्म जाणतात ते ब्राह्मण व अशा ब्राह्मणांना मी वंदन करतों' असे उद्‌गार शेख महंमदबाबांनीं काढले आहेत. खरा ब्राह्मण कोण, त्याचीं लक्षणें काय, याविषयीं शेख महंमदबाबा लिहितातः—

भूदेव ते ब्राह्मण सकळवर्णां श्रेष्ठ ।
ते सांगेन चोखट श्रोतियांला ॥
धोतर टिळे जानवीं नव्हे तीं ब्राह्मण ।
हृदयीं शुचिपण तोचि ब्राह्मण ॥
शेंडी मोचे कडदोरे ब्राह्मण नव्हेती ।
कल्पना मुंडिती ते ब्रह्मरूप ॥
आचारें नव्हे ब्राह्मण नेणती विचार ।
अनामिकाचार केल्या ब्राह्मण नव्हे ॥
आंघोळ संध्या त्रिकाळ ब्राह्मण नव्हे खरा ।
हृदयीं निर्मळ बरा तो ब्राह्मण ॥
पन्नास कोटि मंत्र गायत्री वेद चतुर ।
योग होम थोर ब्राह्मण नव्हे ॥
अनुष्ठान जप-तप नव्हे ब्राह्मण पूर्ण ।
तत्त्वेशीं विज्ञान ब्राह्मण विरक्त ॥
सडा संमार्जन तुळशी—वृंदावन ।
विधी कर्मबंधन नव्हे ब्राह्मण ॥
शेख महंमद ब्राह्मणासी वंदी ।
अब्राह्मणा निंदी ब्रह्मविज्ञानें ॥

× × ×

## कासोटें फिटलें आहे मागें !

नासिक जिल्ह्यांतील भारम गांवांत अडीचशें वर्षांपूर्वीं 'अवचितसुत काशी' या नांवाचा एक क्षत्रिय महाराष्ट्र—कवि होऊन गेला. द्रौपदीस्वयंवरावर याचे दोन मोठे ग्रंथ आहेत. एक ग्रंथ श्लोकबद्ध असून त्याचे चौदा अध्याय आहेत व दुसरा ग्रंथ ओवी-बद्ध असून त्याचे एकोणतीस अध्याय आहेत. काशीकवि हा महानुभाव पंथाचा होता.

या काशीकवीची वाणी प्रासादिक, रसाळ आणि अलंकारपूर्ण अशी आहे. यानें लिहिलेलें 'द्रौपदीस्वयंवर' हें काव्य अत्यंत हृदयंगम आणि रसपूर्ण आहे. त्यांतील हास्यरसाचा एक लहानसा नमुना येथें देतों. द्रौपदीच्या स्वयंवरप्रसंगीं अर्जुन ब्राह्मणवेषानें स्वयंवर—मंडपांत गेला होता. द्रुपदराजानें द्रौपदीच्या स्वयंवरांत लावलेला पण अत्यंत कठीण होता. 'मंडपाच्या एका कोनांत उभारलेल्या मत्स्ययंत्रावरील फिरत्या मत्स्याचा डावा डोळा जो तीन बाणांत नेमका विंधन करील त्याला द्रौपदी

माळ घालील. परंतु ज्याचे तिन्ही बाण फुकट जातील त्यांस तापलेल्या तेलाच्या कढईंत लोटून दिलें जाईल ' असा तो भयंकर पण होता. हा पण जिंकण्यास कोणी क्षत्रिय पुढें होईना. तेव्हां द्रुपदानें ' ब्राह्मणांपैकीं कोणाला पण जिंकावयाचा असेल तर त्यानें पुढें यावें ' अशी विनंती केली. त्यावेळीं अर्जुन पण जिंकण्यासाठीं उठला. एक ' ब्राह्मण ' उठलेला पाहून इतर ब्राह्मण हंसून त्याची थट्टा करीत म्हणाले,

ब्राह्मण हासिन्नले सर्वही । म्हणती सत्य संदेह नाहीं ।
आजी यंत्रवैरी नुरे कांहीं । तुम्हा पुढें सर्वथा ॥ १ ॥

फार उठलेत हो रागें रागें । परी कासोटे फिटलें आहे मागें
कोण्या दुःखास्तव ऐसे वेगें । उबगलेति संसारा ॥ २ ॥

दंडग्रंथी कमंडलु चिरें । विप्रांसि वांटून द्या आदरें ।
मग सुचलें कार्य तुम्ही बरें । सिद्धीस न्या हो आपुलें ॥ ३ ॥

गुरूनें ताडिलें काय स्वामी । कीं वधूसि भाळलेत तुम्ही ।
वरावया पुढिले जन्मीं । देह संकल्पितां ॥ ४ ॥

पण नंतर अर्जुनानें एकाच बाणानें मत्स्यभेद केला तेव्हां याच ब्राह्मणांनीं ' धन्य धन्य ' असें म्हणत आपल्या कानटोप्या, मृगाजिनें, कमंडलु इत्यादि वस्तु बक्षिसादाखल त्याच्याकडे फेंकल्या, असें कवीनें पुढें वर्णन केलें आहे.

× × ×

## स्तंभी प्रकटला नरहरी हो

दोनशें वर्षांपूर्वी पंढरपूर येथें प्रल्हाद शिवाजी बडवे या नांवाचा एक संतकवि होऊन गेला. प्रल्हादकवि उत्तम कीर्तन करीत असे. तो अत्यंत प्रेमळ भक्त होता आणि पांडुरंग त्यांच्याबरोबर बोलत असे अशी आख्यायिका आहे. यानें कांहीं सरस पदें केलीं आहेत. त्यांतलि नृसिंह-वर्णनाचें एक पद वाचकांना अतिशय आवडेल असें वाटतें. म्हणून येथें देत आहे. तें पद असें:—

स्तंभीं प्रकटला नरहरी हो ॥
गडगड गडगड गर्जत घोषें धोकें काळ थरारी हो ॥ धृ० ॥

कडकड स्तंभ कडाडित नादें गडगड गगन विदारी हो ।
घडघड रविरथ विघडत गगनीं तडतड धरणि तडाडी हो ॥१॥

कराळमुख सिंहाचें दाढा विक्राळा व्यंकटा हो ।
पिंगट वर्ण जटा सुभटा करिं नखपंक्ती अति तिखटा हो ॥ २ ॥

धडधड धडधड धडकत नेत्रीं अग्नीचे कल्लोळ हो ।
सळसळ सळसळ वदनि सळाळी विशाळु जिव्हा लोळे हो ॥ ३ ॥

जानूवरि हरि धरि दनुजाधिप रागें उदर विदारी हो ।
काढुनि अरिउदरांतुनि अंत्रें घाली निजकंधरीं हो ॥ ४ ॥

घटघट घोंटित रक्त कंठिचें वाटे काळ भुकेला हो ।
वृत्तवृकापति दिक्पति म्हणती मोठा प्रळय उदेला हो ॥ ५ ॥

सुरवर सुमनें वर्षति हर्षें गर्जति जयजयकारीं हो ।
स्तविती नरकिंकर विद्याधर प्रल्हादकैवारी हो ॥ ६ ॥

× × ×

## सुदाममूर्ति भोजनार्थ माजघरीं चालविली

अनेक रसांच्या विविध कविता तुम्ही आतांपर्यंत ऐकल्या. आतां भोजनाचा एक थाट शेवटीं पहा. श्रीकृष्णाकडे त्याचा मित्र सुदाम हा गेला असतां कृष्णानें त्याचें आगतस्वागत चांगलें केलें. नंतर तो त्याला भोजनासाठीं माजघरांत घेऊन गेला. तिथें सुदामाला कोणतें दृश्य आढळलें? तोंड घट्ट मिटून घ्या आणि अमृतराय कवीनें त्या भोजनसमारंभाचें केलेलें वर्णन ऐका. सुदामाला असें दिसलें:—

मांडुनि स्वस्तिक सुवर्णपाट, अडणीवर सोन्याचें ताट, भवतीं फलशाखांचा थाट, कांठीं वरण पिवळें दाट, मीठ मिरें वरि आलें लिंबू, तुतिया खोबरें, किसून कोशिंबीर सुंदर, आम्ल रायतें, रुचिर आयतें, कोमल अंगीं सगळीं वांगीं, शुभ्र कारलीं, मेथी पोथी बोथी केळें, कोथिंबीर हळदीसह, काथी ताथी साथी चरुसह, चाकवत चुका, चवळी बिवळी, कवळ्या शेंगा, चिमकुरादळ चिरुनि चांगली, चमचमित फोडणी देउनि चरारिति, चारोळी सांभारें, मउ चिमणीं बोंडें, चिंचपान चिंचोळीं तोंडें, कोहळा काशीफळें कांकडि कुहिरिया, कमळकंद कोंवळीं कांचरी, दूध भोंपळे, दिव्य दोडके, दाळ दिंड शेवाळ वाळकें, शेंगा सुरणअरुवारं परवरें, पडवळीं तोंडली, कोंडली कंदमूळ फळ फूल पत्र तरु वेलमात्र घृतपाचित शाका, वडे नसति वावडें, सार आवडे, तिखट तिळवडे, सारब्रिज वडे, सहित पापडे, कथिक वडे; आणिक कोरवडे, शिग्यास गटगट पुऱ्या, बऱ्या गुरवऱ्या, काचोऱ्या सांजोऱ्या, मालत्या बोटवे, शुभ्र देटवे, सायसहित शेवया, शर्करा पायस लुचया, मांडे पांडुरवर्ण पूर्ण पोळिया, घृते घोळिल्या द्विजें गीळिल्या दुरडी भरूनि घिरडीं, नाजुक साजुक नाजुक राजसवाणे, कानवल्यासि मानवले, साखरफेण्या घीवर घारगे, मोतीचूर जिलेबी दळिया, बारिक ओदन दे अनुमोदन, घमघमाट तो अमोद न राहे, भात केशरी परम कूसरी, दहीं दूध घृत मधु साखर, मठ्ठा मिठ्ठा मटमटा, बहु मधुर लापसी, लोणकडे थिजलें गाईचें तूप मधुर सुवासिक महा चंगाळ, थोर घंगाळ, वाटीभर एक एक घरिचें, सोळा हजार पदार्थ आले निजभाग्यें भोजनीं...

पण पुरे! संतकवींची कविता म्हणजे विविध रसांचा ठेवा आहे. त्यांच्या कवितेची गोडी अवीट आहे. उगाच नाहीं तुकारामांचे अभंग अथवा ज्ञानदेवांच्या ओंव्या शतकानुशतकें महाराष्ट्राच्या जिव्हाग्रावर सारख्या घोळत राहिल्या!



---